पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७-२७४४७७८ (११ लाईन्स)
विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email : dsw@sus.ac.in
NAAC Accredited 2022 'B' Grade (CGPA-2.62)
विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development

जा.क्र. पुअहोसोविसो/विद्यार्थी विकास विभाग/२०२५/ 6469

दि. 13 AUG 2025

प्रति,

मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संकुले व संलग्नित महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन एक विभिषिका दिन म्हणून साजरा करणेबाबत...

संदर्भ : उशिसं/विभाजन विभिषिका/परिपत्रक/मवि-१/२०२५/ई.२०५६०७९ ११ ऑगस्ट, २०२५ रोजीचे पत्र व सहपत्र अवलोकनार्थ.

महोदय/महोदया,

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२१ रोजी लाल किल्ल्यावरून आपल्या भाषणात १४ ऑगस्ट या दिवसास "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" (Partition Horrors Remembrance Day) म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती. १४ ऑगस्ट हा दिवस भारताच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लोकवस्ती विभाजनाच्या संदर्भात लाखो भारतीयांच्या विस्थापनाची आठवण करून देतो, ज्यामध्ये असंख्य लोकांचे प्राण गेले आणि कोट्यावधी लोकांनी आपल्या घरा-दाराचा त्याग केला. या दिवशी लोकांनी दिलेल्या बलिदानाची आणि विभाजनाच्या वेळी झालेल्या वेदना, त्रास व दुःख यांना उजाळा देणे आणि सदर दिवसाच्या इतिहासाची युवकांना जाणीव व्हावी म्हणुन दरवर्षी १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" म्हणुन साजरा करण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) यांच्यातर्फे एक विशेष नाटक तयार करण्यात आले आहे. हे नाटक विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आणि विभाजन काळातील घटनांची समज निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या नाटकाची इंग्रजी व हिंदी भाषेतील लिंक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सोवत जोडलेल्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, १४ ऑगस्ट या दिवसास "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" (Partition Horrors Remembrance Day) म्हणून महाविद्यालय/संकुलांनी संदर्भीय पत्र व सहपत्र अवलोकनार्थ घेवून, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयाच्या / संकुलाच्या संकेतस्थळावर सदर नाटकाची लिंक (https://drive.google.com/drive/u/1/folders/1Eakk7hlRSOklAmkHuytDKuAj4lg-IbHA) अपलोड करुन प्रसारित करण्याची कार्यवाही करून १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" म्हणून साजरा करावा.

धन्यवाद!

आपला स्नेहांकित,

(डॉ.केदारनाथ काळवणे)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग
पु.अ.हो.सो.विद्यापीठ,सोलापूर

सोबतः- विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि.७.८.२०२४ च्या पत्राची प्रत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग,केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
Solapur-Pune National Highway, Kegoan, Solapur - 413 255, Maharashtra (India)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१/ ७२/ ७३ (११ लाईन्स) विस्तारित क्र. २२५ फॅक्स क्र. २३५१३००
ईमेल - dsw@sus.ac.in संकेतस्थळ : https://www.sus.ac.in/ व https://su.digitaluniversity.ac/
विद्यार्थी विकास विभाग    Department of Students Development


जावक पुअहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२५-२६/ 6471    दि. 13 AUG 2025

प्रति.

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
पु अ हो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषयः- पंडीत दिनदयाळ उपाध्यायजी यांच्या एकात्मिक मानवतावाद हिरक महोत्सवीनिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने समन्वयक नेमण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र सरकारने राज्यभरात पंडित दिनदयाळ उपाध्यायजी यांच्या कार्यकमांचे स्मरण करण्यासाठी एकात्मिक मानवतावादावर हिरक महोत्सव अयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांना राष्ट्रीय अभिमान आणि वसुधैव कुटुंबकमची भावना जागृत करण्यासाठी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मा. कुलपती कार्यालयाकडून करण्यात आले आहे. त्यास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, एकात्मिक मानवतावाद हिरक महोत्सवी उपक्रमांसाठी खालीलप्रमाणे कृती करण्याबाबत आपल्या महाविद्यालय व संकुलास कळविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१. एकात्मिक मानवतावाद या विषयांवर निबंध वक्तृत्व सामान्य ज्ञान,चित्रकला, घोषवाक्य, रील मेकिंग, वादविवाद, पथनाटय, शॉर्टफील्म काव्यलेखन इत्यादी पैकी किमान दोन स्पर्धांचे आयोजन करण्यात यावी. व त्यांचे प्रथम, व्दितीय व तृतिय क्रमांक विद्यापीठास कळविण्यात यावे या स्पर्धेतून एकात्म मानव दर्शन या संकल्पनेचा प्रचार व प्रचार व्हावा.
२. या उपक्रमात ३५ % विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करावा, विद्यार्थी सहभागाच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.
३. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती दि. (२६/१२/१९१६) आणि त्यांचा स्मृतिदिना (११/०२/१९६८) निमीत्ताने देखील विविध व्याख्याने, कार्यक्रम यांचे आयोजन करावे.
४. सर्व संस्थात्मक ग्रंथालयांमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्यायजी यांच्या वरील संबंधित साहित्य उपलब्ध करण्यात यावे.
५. सदर उपक्रम दि.११/०८/२०२५ ते रोजी २२/०४/ २०२६ या दरम्यान विविध कार्यक्रमाचे विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर आयोजन करण्यात यावे. तसेच सोबत जोडलेल्या पत्रानुसार कार्यवाही करावी व अहवाल विद्यार्थी विकास विभागाकडे dsw@sus.ac.in या ईमेल वर मेलव्दारे पाठविण्यात यावा
६. कार्यक्रमाच्या अनुषंगाने होणारे सर्व खर्च संबंधित महाविद्यालयानी स्वत: करावेत.

तरी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून एक समन्वयकाची नेमणूक प्राचार्यांनी करावी. समन्वयक हे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी असतील. ज्या महाविद्यालयात रासेयो एकक नाही अशा महाविद्यालयातील प्राचार्यांनी समन्वयक म्हणून कोणत्याही एका शिक्षकाचे नामनिर्देशन करून त्याची माहिती दि.२५/०८/२०२५ पर्यंत विद्यार्थी विकास विभागाकडे dsw@sus.ac.in या मेल वर पाठविण्यात यावे हि विनंती।

धन्यवाद,

आपला स्नेहांकित

(डॉ. केदारनाथ काळवणे)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

E:\DSW\pandit din dayal upadhay\latter.docx

1/1360136/2025

...(CLR)/37/2025-COLLWG1


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६
E-Mail : mavi.dhepune@gov.in
Web : www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९


दि. ०६/०८/२०२५

क्र.: उशिसं/मवि-१/एकात्म मा. दर्शन हि. महो/२०२५/ई. २०३९५२९

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः- एकात्म मानवदर्शन हया हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक स्तरावर आयोजन करण्याबाबत.

संदर्भः- मा. राज्यपाल यांचे अवर सचिव, राज भवन, यांचे पत्र क्र.RB/Edn.I/Gen-२०२५/CR-११९/४९३/दि.५.६.२०२५

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना लिहिलेले संदर्भांकित पत्र कृपया अवलोकनी घ्यावे. (सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत सोबत)

युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते. जगभरात सर्वात जास्त युवा वर्ग असणाऱ्या भारत देशातील युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देणे व त्यांना राष्ट्रनिर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित "एकात्म मानवदर्शन" हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला. पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी " एकात्म मानवदर्शन " हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. त्यास सन २०२५ यावर्षी ६० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्त या हीरक महोत्सवी वर्षामध्ये विद्यापीठ /महाविद्यालय स्तरावर आयोजित करावयाच्या कार्यक्रमासाठी पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. एकात्मिक मानवतावाद - निबंध, भाषण, वादविवाद, पथनाटये या विषयावर स्पर्धा आयोजित करणे. तसेच शॉर्ट फिल्मस, रील्स आणि काव्यलेखन इ.

२. विविध कार्यक्रमांचे आयोजन व समन्वयन साधण्यासाठी विद्यापीठ स्तरावर तसेच महाविद्यालय स्तरावर एक प्रभारी प्राध्यापकाची नियुक्ती करावी.

३. किमान ३५ % विद्यार्थी सहभागी होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत आणि सहभागी विद्यार्थ्यांच्या तपशीलवार नोंदी ठेवण्यात याव्यात.

४. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र, विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत.

५. विद्यापीठ स्तरावर एकात्मिक मानवतावादावर एक अध्यासन स्थापन करण्यात यावे.

६. पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती (२६.१२.१९१६) आणि त्यांचा स्मृतीदिनी (११.२.१९६८) देखील विविध व्याख्याने, कार्यक्रम यांचे आयोजन करावे.

७. विद्यापीठ/ महाविद्यालयीन ग्रंथालायांमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावरील संबंधित साहित्याचा स्वतंत्र विभाग करुन विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करावे.

८. सदरचे उपक्रम दि.२२ एप्रिल २०२६ पर्यत सुरू राहतील, या दिशेने नियोजन करावे.

९. उपरोक्त कार्यक्रमांचा खर्च संबंधित संस्थां/ महाविद्यालये यांनी करावा.

उपरोक्त सूचनांप्रमाणे सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे,/ शैक्षणिक संस्था / संलग्नित महविद्यालये यांमध्ये एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक प्रमाणात आयोजन करण्यात यावे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 06-08-2025 13:38:17

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.